# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## आजी-आजोबा व वडीलधारी माणसे ह्यांच्यासाठी प्रार्थना

*(२५ जुलै २०२१ ह्या पोप फान्सिस ह्यांनी घोषित केलेल्या प्रथम आजी-आजोबा व वडीलधा-यांच्या दिवसानिमित्ते कुटुंबात करावयाची प्रार्थना)*

**“मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे” (मत्तय २८ ः २०)**

**गायन** ः प्रभू तव नाम सुवंदित व्हावे .... गीत क्र. १५६ (वसुंधरे गा)

**प्रस्तावना** ः सर्व गोष्टी तुझ्या आहेत, हे प्रभो.

परंपरा सांगते की, संत जोकीम, येशूचे आजोबा, ह्यांना मुल-बाळ नसल्यामुळे आपल्या शेजा-यासमोर ओशाळल्यासारखे वाटत होते. त्यांची पत्नी अन्ना हीच्याही जीवनाची तीच स्थिती होती. ते दाम्पत्य निरूपयोगी मानले गेले होते. परंतु देवाने त्यांना त्याच परिस्थितीत सोडून दिले नाही तर त्यांच्याकडे दुताला पाठवून त्यांचे सांत्वन केले व त्यांच्या पोटी मरिया नावाची एक कन्या जन्म घेणार हा संदेश त्यांना दिला.

देव आजी-आजोबा व वडीलधारी माणसे आणि विशेषकरून जे एकटे आहेत त्यांच्या नेहमीच समीप असतो आणि ते कितीही वृद्ध असले तरीही त्यांना नवीन काहीतरी करण्यास नेहमी चालना देत असतो. ते आपल्या मुळांचे जतन करू शकतात, तरूण वर्गाकडे श्रद्धेचा वारसा हस्तांतरीत करू शकतात आणि लहान बाळांची काळजी घेऊ शकतात. देव कधीच निवृत्त होत नाही आणि त्याचप्रमाणे सर्वांनीच शेवटपर्यंत कार्यरत असावे अशी तो अपेक्षा करतो. देवाचे नाव धन्य असो.

**शास्त्रवाचन** ः यशया ४५ ः ३ - ७

**प्रार्थना** ः स्वर्गीय पित्या, तुझ्या प्रेमाबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. आमच्याप्रति असलेल्या तुझ्या उदारवृत्तीतून तू आम्हास प्रेमळ व निष्ठावान आजी-आजोबा व वडीलधारी माणसे दिली आहेत. त्यांनीच आमच्याकडे श्रद्धेचा वारसा हस्तांतरीत केला आहे आणि श्रद्धेच्या त्या वारसेचे आमच्या अंतःकरणात, स्वतःमध्ये आणि त्यांच्या मुलांच्या म्हणजे आमच्या पालकांच्याद्वारे संगोपण केले आहे. त्यांची तू राखण व संरक्षण कर. त्यांना एकटे किंवा निराश वाटू देऊ नको.

तुझ्या एकुलत्या पुत्राने स्वर्गारोहण करून तुझ्या उजवीकडे बसण्यापूर्वी आपल्या शिष्यांना सांगितले होते “मी तुमच्या बरोबर नेहमी आहे”. ह्या संदेशाची आमचे आजी-आजोबा व वडीलधारी माणसे ह्यांना आठवण करून दे व तो संदेश त्यांच्याही बाबतीत खरा होऊ दे. आमच्यावर कोसळलेल्या महामारीच्या काळात आम्हाला मृत्यू आणि दीर्घकालीन विलगीकरण ह्यांना सामोर जावे लागत आहे. अशावेळी “मी तुमच्या बरोबर नेहमी आहे” हा तुझा संदेश आम्हाला दिलासा देत आहे. पत्येक आजी-आजोबा, वडीलधारी व्यक्ती व

विशेषकरून जे एकटे आहेत त्यांना तुझ्याकडून सांत्वनाचा संदेश घेऊन येणा-या देवदुताची भेट घडो. तुझ्या विश्वासूपणाची साक्ष देणारे शुभवर्तमानातील शब्द त्यांना धीर देवोत. तू आज देखील त्यांना तुझा शब्द घोषविण्याचे काम चालू ठेवण्यास सांगत आहे हे त्यांना शास्त्रातून कळून येवो. आपल्या इच्छेप्रमाणे वागणा-या पवित्र आत्म्याच्या कार्यासाठी ते आपली अंतःकरणे उघडोत.

महामरीचे वादळ सरल्यानंतर जिथे आपली मुले व नातवंडे बंधुत्व व सामाजिक मैत्रीच्या नात्याने राहतील असे जग उभारण्यासाठी त्यांची आवश्यकता आहे या जाणिवेची ज्योत त्यांच्या मनात पेटव.

आमच्या अस्वस्थ व संकटग्रस्त समाजाला आधार देऊन त्याला पुनरूज्जीवीत करण्याच्या कामी ते सक्रिय सहभाग घेतील असे कर. त्यांची न्याय, शांती आणि ऐक्याची स्वप्ने युवकांना नवी दृष्टी देऊन त्यांच्यासाठी उज्वल भविष्य उभारण्यास प्रोत्साहन देवोत. त्यांच्या भूतकाळातील युद्ध व हिंसेच्या वेदनादायक आठवणी युवकांना अधिकाधिक मानवतावादी, प्रेमळ व स्वागतार्ह जग उभारण्यास प्रेरणा देवोत आणि त्यांच्या ओठातून निघणा-या प्रार्थना ह्या महामारीच्या वादळी समुदात एकाच बोटीने प्रवास करीत असलेल्या आपणा सर्वांना अत्यंत गरजेचे असे खोल श्वास बनोत.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आमच्या आजी-आजोबांना व वडीलधा-यांना त्यांच्या कुटुंबियाकडून तसेच त्यांचे नातलग व समाजाकडून पेमळ व आपुलकीची वागणूक मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.
२. वडीलधा-यांच्या समुद्ध आठवणी, स्वप्ने आणि स्वःहित व सामाजिक हितासाठी प्रार्थना करण्याची त्यांची क्षमता ह्याचे भान कुटुंबातील तसेच इतर युवकांना असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
३. समाजातील सर्व वडीलधारी माणसे, आजारी लोक, शारीरिक व मानसिक दृष्टया अपंग असलेले व दुर्लक्षित ह्यांची समाजाकडून चांगल्याप्रकारे काळजी घेतली जावी व त्यांच्या मुलभूत व वैद्यकीय गरजा पुरविल्या जाव्यात म्हणून आपण प्रार्थना करू या.
४. देवाचा शब्द युवक व वडीलधारी ह्यांच्या अंतःकरणात खोलवर रूजावा व त्याद्वारे त्यांना देवाच्या सत्याच्या प्रकाशात मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
५. आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करीत असताना आपण आपल्या कुटुंबातील, आपल्या ओळखीच्या तसेच समाजातील सर्व वडीलधा-यांच्या गरजांसाठी प्रार्थना करू या.

**समारोप प्रार्थना** ः हे प्रभू येशू, संत जोकीम व अन्ना ह्यांची कन्या कुमारी मरिया हिच्यापासून जन्मलेल्या, आमच्या सर्व आजी-आजोबांचे व वडीलधा-यांचे रक्षण कर आणि पृथ्वीवरील सर्व कुटुंबांसाठी ते समुद्धीचे स्त्रोत असावेत असे कर.
माता मरिये, सर्व सजीवांच्या माते, आजी-आजोबांची नेहमी काळजी घे. पृथ्वीवरील जीवन यात्रेत त्यांना सोबत दे. सर्व कुटुंबे एक दिवस आपल्या स्वर्गीय मायभूमीत, जिथे तू सर्व मानवजातीसाठी अनंत काळच्या भव्य अलिंगनासह थांबलेली आहेस, तिथे परतावीत असे कर. आमेन.

आमच्या स्वर्गीय बापा .... ३ नमो मरिया .... त्रैक्य स्तुती..

**समारोप गीत** ः मी कुठे ही ...... गीत क्र. १७९ (वसुंधरे गा)